




# पारनेर दर्शन








वर्ष १ अंक ३०२, बुधवार २१ ऑगस्ट २०२४ | संपादक : देविदास आबूज | कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये


# पारनेरची जागा शिवसेनेला हवी!

## सुषमा अंधारे यांची मागणी ■ पारनेर येथे महाराष्ट्र अस्मिता मेळाव्याचा शुभारंभ

पारनेर : विशेष प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीत उध्दव ठाकरे यांनी सभा घेतली, आदित्य ठाकरे यांनी रॅली काढून नीलेश लंके यांना विजयी करण्याचे आवाहन केले तर आपणही नगर जिल्हयात सभा घेऊन महाविकास आघाडीचा धर्म पाळला आहे. आता महाविकास आघाडीमध्ये पारनेर मतदारसंघाची जागा शिवसेनेला हवी अशी मागणी शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली.**

शिवसेनेच्या राज्यस्तरीय महाराष्ट्र अस्मिता मेळाव्याचा शुभारंभ पारनेरच्या मेळाव्याने झाला. या मेळाव्यात अंधारे यांनी महायुती सरकारवर सडकून टीका केली.

यावेळी बोलताना अंधारे म्हणाल्या, लोकसभा निवडणूकीत आम्ही राष्ट्रवादीला खंबीर साथ दिली आहे. शिवसेनेची मशाल तेवत ठेवण्यासाठी आता आम्हाला पारनेरची जागा हवी आहे. भाऊ म्हणून नीलेश लंके यांच्यासाठी मी सभा घेतल्या.नीलेश लंके यांच्या पत्नी राणी वहिणी माझ्या भगिनी आहेत. लोकसभेला नणंद प्रचारासाठी आली तशीच आता भावजय या नात्याने शिवसेनेच्या प्रचाराला राणी वहिणी येतील असा विश्वास व्यक्त करून अंधारे म्हणाल्या पारनेरची जागा शिवसेनेला मिळाल्यावर उमेदवार कोणीही असो ती निवडूण आणायची आहे. विरोधकांकडे पैसा असला तरी आपल्याकडे सत्व, तत्व, अस्तित्व आहे ते अस्तित्व अबाधित ठेवण्याची जबाबदारी आपली सर्वांची असल्याचे अंधारे म्हणाल्या.

यावेळी तालुका प्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, शिवसेना प्रवक्त्या सुवर्णा वाळुंज, उपजिल्हाप्रमुख संदेश कार्ले, डॉ. भास्कर शिरोळे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख रवी वाकळे, शरद झोडगे, महिला आघाडी प्रमुख प्रियंका खिलारी, युवा सेना तालुकाप्रमुख अनिल शेटे, किसन सुपेकर, शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख गुलाबराव नवले, संतोष येवले, संतोष साबळे, जयसिंग धोत्रे, सुनीता मुळे, नगरसेवक राजू शेख, प्रकाश रोहोकले, डी के पांढरे, बाबासाहेब रेपाळे, सखाराम उजघरे, पोपटराव चौधरी, डॉ. कोमल भंडारी, डॉ. नीता पठारे, डॉ. पद्मजा पठारे यांच्यासह मोठया संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. मेळाव्यापूर्वी अंधारे यांची खालची वेस परीसरातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.



■ शिवसेनेच्या राज्यस्तरीय महाराष्ट्र अस्मिता मेळाव्याचा शुभारंभ शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्या उपस्थितीत पारनेरमध्ये झाला.

### महाराष्ट्राला लागलेला कलंक पुसून काढायचा आहे

शिवसेना सोडून गेलेले गद्दार आम्ही बाळासाहेब ठाकरे यांचे वारसदार असल्याचे सांगत असून आम्हाला त्यांना सांगायला हवे की शिवतीर्थावरून बाळासाहेबांनी त्यांचे वारस म्हणून उध्दव ठाकरे यांचे नाव जाहिर केले होते. गद्दारांनी महाराष्ट्राची अस्मिता मातीत घालण्याचे काम केले. रात्रीच्या अंधारात पळून गेले. ही महाराष्ट्राची अस्मिता नाही तर महाराष्ट्राला लागलेला कलंक आहे. हा डाग आता आपल्याला निवडणूकीत पुसून काढायचा आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. राज्यातील अनेक उद्योगांमध्ये देशातील अनेक लोक रोजीरोटी शोधतात. ही आमची अस्मिता असल्याचे अंधारे यांनी सांगितले.

### परीक्षा फी वर सरकार बोलत नाही

आया बहिणींना तीन हजार रूपये दिले पण आपल्या लेकरांचे काय ? त्यांचे शिक्षण पुर्ण झाले त्यांच्या नोकरीचे काय ? नोकरीसाठी अर्जाची फी एक हजार रूपये आणि पेपर देईपर्यंत २ हजार रूपये खर्च होतात. पेपर दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातमी येते पेपर फुटला. मग परीक्षेसाठी खर्च झालेल्या पैशांचे काय ? सरकारने हे पैसे कधी परत केले का ? वर्षभरात परीक्षेसाठी वीस बावीस हजार रूपये खर्च होतात. त्यावर सरकार काही का बोलत नाही ? असे प्रश्न अंधारे यांनी यावेळी उपस्थित केले.

### आमचे सरकार आल्यावर तीन हजार रूपये देऊ

लाडकी बहिण योजनेचे पैसे आले असतील ते हक्काने घ्या. कारण हे पैसे आपलेच आहेत. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या खिशातून दिलेले नाहीत. महाराष्ट्राच्या जनतेच्या खिशातून, तुमच्या कष्टाचे व तुमच्या माय भावाचे ते पैसे आहेत. त्यामुळे पंधराशे रूपये घ्यायला अजिबात कुचराई करायची नाही. आपल्याच करातून हे पैसे देण्यात येत असून महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर आम्ही या योजनेची रक्कम तीन हजार रूपये करू अशी ग्वाही अंधारे यांनी दिली.

### फडणवीसांवर टीकास्त्र

देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या परंपरा नासविल्या. परंपरा, संस्कृती निम्न स्तरावर गेल्या आहेत. राजकाणातील अनेकांवर त्यांनी आरोप केले, माज मात्र त्यांनाच मांडीवर घेउन बसले आहेत. आता राजन साळवी आणि नितीन देशमुख यांच्यामागे ससेमीरा लावण्यात आला आहे. देशमुख यांच्या मुलांच्या शिक्षणावर किती खर्च झाला याची चौकशी करण्याचे पाप करण्यात येत आहे. संजय राउत यांच्या मुलीच्या लग्नात मेहंदीचा खर्च किती झाला याचीही चौकशी करण्यात आली असून महाराष्ट्राची संस्कृती अशी कधीही गलीच्छ झाली नव्हती असे सांगत अंधारे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकास्त्र सोडले.

### विखे यांनी इंग्रजीचा मुद्दा पुन्हा उपस्थित करावाच !

लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारासाठी मी नगरला आले होते त्यावेळी भाजपा उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी लंके यांच्या इंग्रजी बोलण्याचा मुद्दा पुढे केला होता. त्यावेळी आपण ज्यांना इंग्रजी बोलता येते त्यांनी विखे यांना तर ज्यांना मराठी बोलता येते त्यांनी लंके यांना मतदान करून मराठीची अस्मिता जपण्याचे आवाहन केले होते. मतदारांनी मराठीची अस्मिता जपत लंके यांना विजयी केले. आता विखे यांनी पुन्हा मराठीचा मुद्दा उपस्थित करावाच असे आव्हान अंधारे यांनी यावेळी दिले.

### पारनेरची शिवसेना अभेद्य

गद्दारांनी घात करून शिवसेनेत फुट पडल्यानंतर पारनेर तालुका मात्र उध्दव ठाकरे यांच्या पाठीशी खंबिरपणे उभा राहिला. संकटाच्या काळात आम्ही शिवसेना वाढवा अभियान राबविले. गद्यारांसोबत शिवसैनिक गेला नाही. तालुक्यातील शिवसेना अभेद्य राहिली. लोकसभा निवडणूकीत आम्ही नीलेश लंके यांना खंबिर साथ दिली. त्यांच्या विजयात शिवसैनिकांचा मोलाचा वाटा आहे. लोकसभा निवडणूकीत निर्णय घेण्यास वेळ लागला असला तरी उध्दव ठाकरे यांच्या फोननंतर शिवसैनिक सक्रिय झाले. नगर येथे बैठकीत शिवसेनेला पारनेर मतदारसंघ सोडण्याचा शब्द देण्यात आला असून सेनेसाठी जागा घेण्याची जबाबदारी संजय राउत यांनी घेतली आहे. श्रेष्ठी जो उमेदवार देतील त्याच्या पाठीशी आम्ही खंबिरपणे उभे राहू.

डॉ. श्रीकांत पठारे
शिवसेना तालुकाप्रमुख

### गुजरातला जाणारे उद्योग अडवायचे आहेत

ग्रामीण भागातील लोक पुण्या, मुंबईला रोजगारासाठी जातात. मात्र राज्यातील एक एक उद्योग गुजरातला हालविला जात आहे. आता गुजरातला जाणारे उद्योग आडविण्याची जबाबदारी आपली असून आपणास महाराष्ट्राचे भविष्य, अस्मिता जपायची असल्याचे अंधारे म्हणाल्या.

### यांना बहिण भावाचे नाते काय कळाले ?

ज्या अजित पवार यांनी लाडकी बहिण योजनेची घोषणा केली त्यांनीच आपल्या बहिणीच्या विरोधात लोकसभा निवडणूकीत उमेदवार दिला. मग यांना बहिण भावाचे नाते काय कळाले असा सवाल अंधारे यांनी केला.

### पेपर फोडणारे, जाहिरातबाज सरकार

सरकारने घेतलेल्या सत्तर टक्के परीक्षांचे पेपर फुटले. आयआयटी, नीट परीक्षेचेही पेपर फुटले. तलाठयाच्या २०० मार्कांच्या परीक्षेत विद्यार्थ्याला २१६ मार्क पडतात. त्यामुळे हे सरकार पेपर फोडणारे, जाहिरातबाज सरकार असल्याचा घणाघात अंधारे यांनी केला.

### मुख्यमंत्री गुजरातचे मुनीम आहेत का ?

मोदी सरकार महाराष्ट्रातील कांद्यावर निर्यातबंदी आणते तर दुसरीकडे गुजरातच्या कांद्याला मात्र निर्यातीस परवाणगी दिली जाते. त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे केंद्र सरकारला जाब का विचारत नाहीत ? ते गुजरातचे मुनीम आहेत का असा सवाल अंधारे यांनी यावेळी केला.

### वेडयाची जत्रा आणि कारभारी सतरा !

राज्यात सोयाबिनचे बियाणे, लसून बनावट मिळू लागला आहे. तसेच हे सरकारही बनावट आहे. या सरकारने राज्याची नव्हे तर देशाची अस्मिता वेशीला टांगली आहे. केंद्र सरकार पाठींबा देणा–या नितीशकुमार, चंद्रबाबू नायडू यांच्या बिहार, आंध्रप्रदेशवर निधीची खैरात करते. अंदर बाहर करणाऱ्या या सरकारने महाराष्ट्रासाठी काहीच दिले नाही. वेडयाची जत्रा आणि कारभारी सतरा अशी यांची गत झाल्याची टीका अंधारे यांनी केली.

### गद्दारांच्या टेंभी नाक्यावर कोणी आलेच नाही !

महाराष्ट्र दिल्लीपुढे कधीही झुकला नाही. भाजपा सेना युतीच्या जागावाटपासाठी प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, नितिन गडकरी हे मातोश्रीवर येत. त्यानंतर जागावाटपाची घोषणा होत असे. लोकसभा निवडणूकीच्या जागावाटपासाठी शिवसेना सोडून गेलेल्या गददारांच्या टेंभीनाक्यावर मात्र कोणी गेले नाही. गददार महाराष्ट्राची अस्मिता गहाण टाकण्यासाठी दिल्लीला गेल्याचा टोला अंधारे यांनी यावेळी लगावला.

### बहिण भावाच्या नात्याची जाहिरात करायची नसते

देशाला बहिण भावाच्या पवित्र नात्याची परंपरा आहे. ही आब्रु झाकून ठेवायची असते. त्याची जाहिरात करायची नसते. एखाद्या भावाने बहिणीला साडी घेतली तर त्याचे बॅनर लावायचे नसते. लाडकी बहिण योजनेला नव्हे तर जाहिरात बाजीला आमचा विरोध आहे. सरकारकडून पारंपारीक अस्मितेला पायदळी तुडविले जात आहे असे अंधारे म्हणाल्या.

### मुख्यमंत्री म्हणून ठाकरे यांचे नाव पुढे हवे

सर्वांच्या त्यागातून महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके हे खासदार झाले आहेत. आता पारनेर–नगर मतदारसंघाची उमेदवारी शिवसेनेला मिळाली पाहिजे. लोकसभा निवडणूकीत उध्दव ठाकरे यांनी आक्रमक भुमीका घेतल्यामुळे निवडणूकीत यश आले. विधानसभा निवडणूकीमध्ये मुख्यमंत्री म्हणून उध्दव ठाकरे यांचे नाव पुढे आले पाहिजे.

संदेश कार्ले
शिवसेना नेते

### भीक देत नाही, आमच्याच कष्टाचे देताय

योजनेच्या माध्यमातून सरकारचे प्रतिनिधी महिलांना भिक देत नाहीत तर आमच्याच कष्टाचे देताय. आमच्या लेकरांना सुरक्षितता हवी आहे. लेकी बाळींची आब्रु सुरक्षित राहीली पाहिजे. तुमचे दिड हजार रूपये नकोत असे सांगत अंधारे यांनी सरकारच्या योजनेवर टीका केली.

### ठाकरे यांच्या कामाचे कौतुक

उध्दव ठाकरे तसेच राजेश टोपे यांनी कोरोना संकटात अतिशय चांगले काम केले. त्यांच्या नियोजनामुळे एक लाख रूग्णांचे प्राण वाचले. जागतीक आरोग्य संघटनेचा अहवाल तसे सांगतो. लोकसंख्येची सर्वाधिक घनता असलेल्या धारावीमध्ये कोरोनाचा फैलाव होऊ नये म्हणून राबविलेल्या उपाययोजनांचा पॅटर्न जगात प्रसिध्द झाल्याचे सांगत महाविकास आघाडीच्या काळातील कामाचे अंधारे यांनी कौतुक केले.






### महाराष्ट्राच्या लेकी विकाऊ नाहीत

पंतप्रधान नरेंद्र मोदी वन नेशन वन इलेक्शनची भाषा करतात. मग महाराष्ट्रात गेल्या अडीच वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका का घेतल्या गेल्या नाहीत ? कारण यांना निवडणूकांची भिती वाटते आहे. विधानसभा निवडणूकीचीही त्यांना भिती वाटत असून त्यामुळेच त्यांनी ही निवडणूकही पुढे ढकलली आहे. लाडक्या बहिण योजनेचा एखादा हप्ता देउन भुलविण्याचा त्यांचा प्रयत्न असेल मात्र महाराष्ट्राच्या लेकी विकाउ नाहीत, त्या महाराष्ट्राची अस्मिता जपणाऱ्याअसल्याचे अंधारे यांनी ठाणकावून सांगितले.

### फडणवीस अकार्यक्षम व नापास गृहमंत्री

देवेंद्र फडणवीस हे साडेसात वर्षे गृहमंत्री राहिलेले आहेत. मात्र सुरक्षितता देण्यात येते वारंवार अपयशी ठरले आहेत. अन्यायाविरोधात आंदोलन केले तर ते लाठीचार्ज करतात. आंतरवली येथे मराठा समाजावर, आळंदीत वारकऱ्यांवर तर कोकणात प्रकल्पाला विरोध करणाऱ्यां आंदोलकांवर लाठीचार्ज करण्यात आला. आजवरच्या गृहमंत्र्यांमध्ये फडणवीस हे अकार्यक्षम व नापास मुख्यमंत्री असल्याचे अंधारे म्हणाल्या.

### आता पक्षफोडयाची गोष्ट सांगावी लागेल !

गृहमंत्री म्हणून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आपल्या पदाचा वापर करण्याऐवजी पक्ष फोडण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी वापर केला. पूर्वी लहान मुलांना लाकुडतोडयाची गोष्ट सांगितली जात असे आता पक्ष फोडयाची गोष्ट सांगावी लागेल अशी उपहासात्मक टीका अंधारे यांनी केली.

### आम्ही चॅप्टर बहिणी !

लोकसभा निवडणूकीत मतदारांनी गद्दारांना जागा दाखवून दिली. लोकसभेमध्ये जागा दिसल्याने लाडकी बहिण योजना आणण्यात आली. आम्ही तुमच्या चॅप्टर बहिणी आहोत हे लक्षात ठेवा. दिड हजार रूपये पाठवून दोन हजार महिलांना बँकेच्या दारात उभे करण्यात आले. जसे पंधराशे रूपये दिले मग मोदींच्या १५ लाख रूपयांचे काय झाले ? हे गणित न कळण्याइतकी महाराष्ट्रातील जनता मुर्ख नाही. शेतकऱ्यांच्या शेतमालास हमीभाव द्या. अशा कुबडयांची आम्हाला गरज नाही. शेतकरी तुमच्या भुलथापांना बळी पडणार नाही.

सुवर्णा वाळुंज
शिवसेना प्रवक्त्या




# युवा

# परफेक्ट निवडताना!



**लग्नासाठी परफेक्ट स्थळ निवडणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. जर तुम्ही लग्न अगदी पारंपरिक पद्धतीने करत असाल म्हणजे अगदी वधूवर सुचक मंडळात जाऊन तुम्ही नाव नोंदवले असेल तर अशावेळी स्थळ निवडताना खूपच जबाबदारीपूर्वक काम करावे लागते. कारण बरेचदा लग्न जुळवताना फसवणुकीचे किस्से तुम्हीही ऐकले असेल. लग्न करण्यापूर्वी सांगितलेल्या बऱ्याच गोष्टी या खोट्या सांगितल्या जातात. या गोष्टी लग्न झाल्यानंतर कळतात. अशावेळी परफेक्ट आणि अचूक स्थळ निवडताना किंवा कोणताही निर्णय घेण्याआधी या गोष्टी नक्कीच लक्षात घ्यायला हव्यात...**

- स्थळांची करा पडताळणी : तुम्हाला आलेल्या कोणत्याही स्थळाची पडताळणी करणे हे सगळ्यांसाठीच फार महत्वाचे असते खूप जण स्थळांची पडताळणी म्हणावी तशी करत नाही. वर वर पाहता एखादी व्यक्ती चांगली दिसली की त्याची चौकशी करणे सोडून देतात. हल्ली मोबाईल आणि डेटला जाणे अधिक पसंत केले जाते. त्यामुळे होते असे की, वर वर पाहता एखादी व्यक्ती सुंदर दिसली की त्या व्यक्तीच्या प्रेमात पडल्यासारखे होते. प्रेम ही अशी गोष्ट आहे जी झाल्यानंतर स्थळामध्य असलेली एखादी खोटही तुम्ही दुर्लक्षित करता असे मुळीच करु नका. सगळ्यात आधी तुम्ही स्थळ योग्य तपासून घ्या. त्याचे वय, कुटुंब, मिळकत, नोकरीचे ठिकाण, राहण्याचे ठिकाण, घेतलेल कर्ज या गोष्टींची माहिती असणे हे फारच गरजेचे असते. जर या गोष्टी माहीत करुन न घेता तुम्ही लग्नाचा निर्णय घेतला तर तो तुम्हाला भारी पडू शकतो.



- पत्रिका घ्या पाहून : पत्रिका पाहणे हे आताच्या जनरेशनसाठी फारच जुनी अशी पद्धत आहे. प्रेमविवाह केला असेल तर अशावेळी पत्रिका पाहिलीसुद्धा जात नाही. पण अरेंज मॅरेज किंवा जुळवून लग्न करताना पत्रिका पाहणे हे फारच महत्वाचे ठरते. खूप जणांना पत्रिकेतील बऱ्याच गोष्टी जाणून घ्यायच्या असतात. पत्रिकेतील नाडी, रास, लग्न रास, असलेली एखादी समस्या जाणून घेणे खूपच महत्वाचे असते. जर तुमच्याकडे कोणी पत्रिका मागत असेल तर त्यांना तुम्ही अवश्य पत्रिका द्या. गूण जुळत असतील किंवा नसतील तरीदेखील त्यामधला काही मार्ग नक्कीच काढता येतो. त्यामुळे जर तुम्हाला यावर विश्वास असेल तर तुम्ही अवश्य पत्रिका बघा. म्हणजे तुमच्या मनाचे समाधान होईल.
- देवाण घेवाणाची बोलणी : देवाण घेवाणाची बोलणी ही देखील लग्नासाठी फार महत्वाची असते. खूप ठिकाणी लग्नाचा खर्च हा अर्धा अर्धा केला जातो. तर काही ठिकाणी मुलींनी सगळे लग्न करावे अशी अपेक्षा असते. त्यामुळे बरेचदा नात्यात तणाव येण्याची शक्यता असते. पैशांचे वाद हे नात्यात तडा आणण्यासाठी पुरेसे असतात. ज्या कुटुंबाशी तुम्ही संबंध जोडायचे म्हणत आहात किंवा विचारात आहात अशा कुटुंबाचे विचार जाणून घ्या. लग्नासंदर्भात त्यांचे विचार काय आहेत ते जाणून घ्या. म्हणजे तुम्हाला त्या कुटुंबाबद्दलची योग्य माहिती मिळू शकेल.कधी कधी या गोष्टीच कुटुंब आणि माणसं जाणून घेण्यासाठी महत्वाच्या असतात. त्यामुळे तुम्हाला आलेल्या स्थळातून परफेक्ट स्थळ निवडताना तुम्ही या गोष्टी करायला हव्यात.

# खास व्यक्तीचा बर्थ डे...

**वाढदिवस महत्त्वाचा आहे कारण या दिवशी प्रत्येकाला आपण खास असल्याची जाणीव हा दिवस देतो. त्यांच्यावर जवळच्यांचे आणि इतरांचेही किती प्रेम आहे ते हा दिवस दाखवून देतो. वाढदिवसामुळे एखाद्याला पुन्हा एकदा नवचैतन्याने जगण्याचं बळ मिळू शकतं...**



## *वाढदिवस लक्षात कसा ठेवावा ?*

*अनेकदा आपल्याला एखाद्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा संदेश द्यायच्या असतात. जसं बहीण-भावाला, पत्नीकडून पतीला किंवा पतीकडून पत्नीला, आई-वडिलांना, लाडक्या मुला- मुलीला, मित्र-मैत्रिणीला वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायच्या असतात. पण प्रत्येकाचा वाढदिवस लक्षात ठेवणे सोपे नाही. आता सोशल मीडियामुळे आपल्याला एखाद्याच्या वाढदिवसाचं नोटिफिकेशन येतं. पण काही जण सोशल मीडियावर नसतात. तेव्हा मात्र त्यांचा वाढदिवस लक्षात ठेवण्यात पंचाईत होते. तसंच काहींचा वाढदिवस हा फेसबुक नोटिफिकेशनपेक्षाही आपल्यासाठी जास्त महत्त्वाचा असतो. त्यामुळे आपल्याला त्यांच्या खास दिवसाची आधीच तयारी करायची असते. हा वेळ आपल्याला फेसबुक देत नाही.*

## *काय कराल... ?*

*तुमच्या फोनमधील किंवा शक्य असल्यास घरातील कॅलेंडरवर तुमच्या जवळच्यांचा आणि मित्रपरिवाराच्या वाढदिवसाचे दिवस नोंद करून ठेवा. यामुळे तुम्हाला एकाच ठिकाणी सगळ्यांचे वाढदिवस पाहता येतील. जर तुम्ही डायरी लिहीत असाल तर त्यात वाढदिवसाच्या नोंदी करून ठेवा. आजकाल डिजीटल कॅलेंडर्सही मिळतात. ज्यामुळे तुमचं काम नक्कीच सोपं होईल. यामुळे तुम्हाला वाढदिवस यायच्या आधीच कळेल आणि वाढदिवसाचं प्लॅनिंगही करायला वेळ मिळेल.*

## वाढदिवसासाठी नोटबुक किंवा डायरी

साध्या कॅलेंडरवर कुठे प्रत्येक महिन्याला वाढदिवस लिहीत बसणार नाही का? त्यापेक्षा तुमच्या रोजच्या डायरीत किंवा नोटबुकमध्ये नोंद करून ठेवा तुमच्या आवडत्या व्यक्तींच्या वाढदिवसाची. कारण रोज उठल्यावर किंवा कामाला सुरुवात करण्याआधी बरेच जणांना डायरी पाहायची सवय असतेच तर काहींना रात्री झोपण्याआधी डायरी लिहायची सवय असते. आपल्या प्रत्येकाकडे आजकाल स्मार्टफोन असतोच. ज्याच्या कॅलेंडरमध्ये बरेचदा तुमच्या गुगल कॉन्टॅक्टप्रमाणे माहिती नोंदविली जाते. हे डिजीटल कॅलेंडर तुम्ही अपडेट ठेवल्यास तुम्हाला आपोआप मीटींग किंवा इव्हेंट रिमाइंडरसोबत बर्थडे रिमाइंडर्सही येतील.

## खास डिजीटल ॲप

आजकाल डिजीटल ॲपचा जमाना आहे. प्रत्येक गोष्टीसाठी आता ॲप उपलब्ध आहे. मग वाढदिवसासाठी नाही असं कसं होईल. वाढदिवस लक्षात ठेवण्यासाठीही ॲप स्टोरवर अनेक ॲप उपलब्ध आहे. तुमच्या आवडीनुसार ॲप निवडा.

## वाढदिवसाला शुभेच्छा देणं का आहे महत्त्वाचं...




तुमच्या एका वाढदिवस शुभेच्छेने जर तुमचं नातं दृढ होणार असेल तर का नाही? मग ते प्रोफेशनली असो वा पर्सनली असो. जेव्हा एखाद्या बँकेकडून किंवा बिझनेसकडून कस्टमरचा वाढदिवस लक्षात ठेवला जातो. तेव्हा कस्टमरला नक्की छान आणि कौतुकास्पद वाटतं. जेव्हा आपला एखादा मित्र आपल्याला सरप्राईज किंवा स्पेशल गिफ्ट पाठवतो. तेव्हा आपल्याला आपली काळजी घेणारं कोणीतरी आहे असं नक्कीच वाटतं. जेव्हा एखादा बॉस आपल्या कर्मचाऱ्याला हॅपी बर्थडे विश करतो, तेव्हा कर्मचाऱ्यालाही त्याच्या कामाची किंवा त्या कंपनीत असल्याची पोचपावती खऱ्या अर्थाने मिळत असते.

# लग्नानंतरची दोन वर्षे अधिक काळजीची!

**संसार हा संघर्ष व समस्यांनी भरलेला असतो. काही जोडपी लग्नानंतर काहीच काळात वादाची शिकार होतात तर काही जोडपी नातं घट्ट ठेवण्यासाठी शक्य तितके प्रयत्न करताना दिसून येतात. आता ती गोष्ट वेगळी आहे की, लग्नानंतर नातं घट्ट व मजबूत बनवण्यासाठी अनेक प्रयत्न करून देखील काही लोकांचं नातं खिळखिळं होत जातं. पण लग्नानंतर सुरुवातीचे दोन वर्षे अत्यंत महत्त्वाची असतात. या सुरुवातीच्या काळात काही जोडपी एकमेकांना समजून घेण्यासाठी व खुश राहण्यासाठी एकमेकांच्या जास्तीत जास्त सहवासात राहतात तर काही जोडपी जबाबदाऱ्या व कर्तव्याच्या ओझ्याखाली दबून गेल्यासारखी राहू लागतात. यामुळे दोघांमध्ये नकारात्मक विचार जन्मास येऊ लागतात. म्हणूनच आज आम्ही सुरुवातीच्या दोन वर्षांचा काळ कसा सांभाळावा यासाठी काही खास टिप्स देणार आहोत...**



- प्रेमाने वागा : लग्नानंतर पहिले दोन वर्षे प्रत्येक जोडपं नातं घट्ट करण्यासाठी प्रयत्नशील असतं यात काहीच शंका नाही. या काळात पती-पत्नी एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करतात शिवाय एकमेकांच्या माहित नसलेल्या सवयी देखील त्यांना कळतात. प्रेमविवाह केलेल्या जोडप्यांना एकमेकांमधील चांगल्या-वाईट सवयी माहित असतात तर अरेंज्ड मॅरेजमध्ये याच्या एकदम उलट असते. अशावेळी आपल्या जोडीदाराची एखादी सवय खटकू लागल्यास त्यावरून वाद घालत बसण्यापेक्षा प्रेमाने संवाद साधा व समस्या सोडवा.
- नात्याची सुरुवात करा सकारात्मक : नातं कोणतंही असो, ते सकारात्मक विचारांनी सुरू करण्याचा सल्ला दिला जातो. असं यामुळे की, लग्नानंतर अनेक लोक स्वतःला जबाबदाऱ्या व कर्तव्यात बांधलं असल्याचं फिल करतात आणि या कारणामुळे त्यांना आपल्या जोडीदाराप्रती नकारात्मक भावना व भंग झाल्याच्या भावना मनात येऊ लागतात. पण ही चूक न करता प्रत्येक जोडप्याने आपलं सांसारिक जीवन एखाद्या मजेदार राईडसारखं जगलं पाहिजे. कारण यात एकमेकांसोबत आनंदाने जीवन जगण्याचा व एकत्र काही नवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळते.
- रोमांस जिवंत ठेवा... : लग्न काळातील मजा व हनीमून संपल्यानंतर काही जोडप्यांना पुन्हा एकदा पहिल्यासारखं जीवन रटाळ वाटू लागतं. काही जोडपी हे विसरूनच जातात की सांसारिक जबाबदाऱ्या व कर्तव्य पार पाडण्यासोबतच रोमांस जिवंत ठेवणंही गरजेचं असतं व हे शक्यही होऊ शकतं. नातं फ्रेश ठेवण्यासाठी हनीमूनसारख्या छोट्या मोठ्या ट्रिप्स काढणं गरजेचं असतं. या ट्रिप्स मध्ये एकमेकांना वेळ देण्याची संधी मिळते. शिवाय रोजच्या जीवनात काहीतरी नाविन्यपूर्ण गोष्टी अनुभवता येतात.



- संवाद कायम राखा : लग्नानंतरच्या सुरुवातीच्या काळात अनेक जोडपी विविध कारणांमुळे एकमेकांशी संवाद साधणं टाळतात. जे की त्यांच्या संसारात गैरसमजांना निमंत्रण देऊ शकतं. संवाद आटल्यास पुढे जाऊन नातं खिळखिळं होऊ शकतं हे अनेक जोडपी विसरूनच जातात. त्यामुळे या काळात दूर पळण्यापेक्षा, वाद घालण्यापेक्षा, संवाद टाळून रुसून बसण्यापेक्षा एकमेकांना समजून घेण्याचा प्रत्येक जोडप्याने प्रयत्न करावा. संवाद ही सुखी नात्याची पहिली पायरी असते जी पार करणं सोपं नसतं.
- एकमेकांना वेळ द्या : लग्नानंतरचा सुरुवातीचा काळ असा असतो ज्यामध्ये तुम्ही नातं घट्ट करण्यासोबतच एकमेकांच्या मनात आपला आदर रुजवू शकता. बहुतांश जोडपी लग्न झाल्या झाल्या ऑफिसच्या कामाच स्वतःला जुंपून टाकतात याचा प्रभाव नव्याने सुरू झालेल्या सांसारिक आयुष्यावर पडू शकतो. यामुळे एकमेकांना जाणून घेण्याची संधीच मिळत नाही व यामध्ये एकमेकांविषयी चुकीचे समज बनवून पार्टनर तसं वागू लागण्याची शक्यता अधिक असते. शिवाय आपल्यासाठी जोडीदाराला वेळच नाही ही भावना मनात असुरक्षितता व नकारात्मक भावनांना खतपाणी घालू शकते. म्हणून लग्नाच्या सुरुवातीलाच नाही तर आयुष्यभर आपल्या जोडीदाराला भरपूर वेळ द्या व नातं सजीव ठेवण्याचा प्रयत्न करा.

# खासगी आयुष्याचं शेअरिंग करताना....

**सोशल मीडियाचं वाढतं क्रेज पाहता प्रत्येक जण आपल्या आयुष्यातील सामान्य ते खास क्षण तिथे हमखास शेअर करताना दिसतात. लग्न ठरल्यापासून हनिमूनपर्यंतच्या प्रवासात साजरे केलेले सारेच आनंदाचे क्षण नवविवाहीत जोडपी आपल्या कुटुंबीय व मित्रमंडळींसोबत सोशल मीडियावर शेअर करतात. जिथे सामान्य लोक फोटो टाकण्यात उशीर करत नाहीत तिथे सेलिब्रेटीचं काय घेऊन बसलायत? आवडत्या कलाकारांच्या फोटोंना चाहत्यांकडून लाखोमध्ये लाईक्स व कमेंट्स असतात. शिवाय ॲक्टिव राहण्यासाठी व आपल्या आयुष्याशी चाहत्यांनी जोडलेलं राहावं म्हणून कलाकारही आपले फोटो व विचार रोज सोशल मीडियावर शेअर करत असतात. हनीमूनचे फोटो सोशल मीडियावर अपलोड करणे खरंच योग्य आहे का? म्हणजे असे खासगी आयुष्याशी निगडीत फोटो कुठेही अपलोड करताना काही बेसिक गोष्टींची खबरदारी बाळगणं गरजेचं असतं, यापासून हल्लीची पिढी अनभिज्ञ आहे का?**



## इन्टिमेट फोटो टाकू नका...

भलेही आपला समाज आता पुढारतोय, मॉर्डन विचार स्विकारतोय पण तरीही किंसीग किंवा बेडरुममधील खासगी फोटो सोशल मीडियावर शेअर केल्याने तुम्ही लोकांच्या नजरेत येऊ शकता व नकारात्मक कमेंट्सचा तुम्हाला सामना करावा लागू शकतो. याबाबतील कलाकरांकडून अजिबात प्रोत्साहित होऊ नका, कारण त्यांच्या व तुमच्या फ्रेंड सर्कल-कुटुंबीयांमध्ये खूप अंतर असतं. सामान्य लोकांना काही मर्यादांचं पालन हे करावंच लागतं. तसंही इन्टिमेंट व रोमॅंटिक क्षण हे नवरा- बायकोमधील खासगी गोष्ट असून ती खासगीचं ठेवणं शहाण्याचं लक्षण असतं.

## जोडीदाराचाही विचार करा

तुम्हाला भलेही हनीमूनचे फोटो शेअर करण्यात काहीही चूक किंवा लाज वाटत नसेल पण कदाचित जोडीदार या गोष्टीबाबत कम्फर्टेबल नसू शकतो. अशावेळी त्याच्याही भावनांचा आदर करा. फोटो शेअर करण्यास तो अथवा ती तयार झाले तरीही सिलेक्ट केलेले फोटो एकदा त्याला जरुर दाखवा व त्याने सांगितल्यास एखादा फोटो काढूनही टाका. भलेही ही साधारण गोष्ट असेल पण एकमेकांच्या मनाचा व भावनांचा विचार केल्यास नातं अधिक दृढ होईल व जोडीदाराच्या मनातील तुमच्याबद्दलचा आदर आणखीनच वाढेल.

## शेअरिंग लिस्ट करा फिल्टर

आजकाल सोशल मीडियाद्वारे लोक कुटुंबीय, मित्रमंडळी, सहकारी, बॉस, नातेवाईक, शेजारी सर्वांशी जोडलेले असतात. अशावेळी तुम्ही शेअर केलेली प्रत्येक गोष्ट या लोकांच्याही नजरेस पडते. म्हणून फोटोंसाठी फिल्टर वापरणं गरजेचं आहे. खास करून हनीमून फोटो शेअर करताना अशा लोकांना नक्की हाईड करा जे याला चर्चेचा विषय व हसू बनवू शकतात. प्रत्येक व्यक्तीलाच आपल्या खास क्षणांचं कौतुक वाटेल, आनंद होईल असं मुळीच नाही. त्यामुळे आपल्या जीवलगांसोबत फोटो शेअर करताना फिल्टरचा वापर जरूर करा.

## लोकेशन शेअर करू नका

तुम्ही भले इंडियात फिरा किंवा बाहेरच्या देशात, पण एक्जेट लोकेशन शेअर करणं टाळा. सुरक्षितता लक्षात घेता असं करणं अत्यंत आवश्यक आहे. हनीमूनवरून परत घरी आल्यानंतर जर तुम्ही फोटोसहित लोकेशन शेअर करताय तर काही चिंता नाही पण फिरत असतानाच लोकेशन ॲड करणं समस्येला निमंत्रण देऊ शकतं. त्यामुळे तुम्ही एखाद्या ५ स्टार हॉटेलमध्ये राहा किंवा मग रिसॉर्टमध्ये, पण लोकेशन मात्र गुपितच ठेवा.

## सोशल मीडियापासून राहा लांब

सोशल मीडिया हल्ली एखाद्या व्यसनाप्रमाणे पसरतं आहे. म्हणजे एखादा व्यक्ती सोशल मीडियावर नसणं हे गावठीपणाचं लक्षणं मानलं जातं, अर्थात लोक असं हिनवतात. त्यामुळे अंदाजे ९९% लोकं ही आजच्या काळात हमखास सोशल मीडियाचा वापर करतात. इतर वेळी मन रमवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करणं वेगळं व आपल्या खास क्षणातही सोशल मीडियाला प्राधान्य देऊन आयुष्याचा हिस्सा बनवणं वेगळं. असं केल्याने तुम्ही हनीमून असो किंवा मग इतर कोणता क्षण, योग्य रितीने एन्जॉय करुच शकत नाही. २४ तास फोटो अपलोड करण्यास व्यस्त असल्यामुळे जोडीदारही कंटाळू शकतो. त्यामुळे आपल्या गोड क्षणांचा जास्तीत जास्त आनंद लुटा. स्वतःसाठी फिरा.



## शॉर्ट न्यूज

### हंगा येथील ट्रान्सपोर्ट ऑफिस फोडले

■ **सुपा :** एमआयडीसी परिसरातील हंगा गावातील ट्रान्सपोर्ट ऑफिस फोडून चोरट्यांनी लॅपटॉप, झेरॉक्स प्रिंटर, वायफाय मशीन, असा एकूण ४१ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना काल सकाळी उघडकीस आली. याबाबत वैभव विश्वनाथ नगरे (रा. हंगा, ता. पारनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुपा पोलिस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस नाईक मासळकर करीत आहेत.

### हरेगाव येथील कब्रस्थानमध्ये वृक्षारोपण

■ **श्रीरामपूर :** तालुक्यातील हरेगाव येथील मुस्लीम कब्रस्थानमध्ये वृक्षरोपण करण्यात आले. यावेळी सरपंच दिलीप त्रिभुवन, ग्रा. पं. सदस्य रमेश भालेराव, अतुल भालेराव, भाजप अल्पसंख्याक मोर्चा तालुका उपाध्यक्ष मुन्नाभाई शेख, कयाम देशमुख, नुरकलाम तांबोळी, महेबूब शेख, आयाज शेख, फिरोज पठाण, समीर शहा, सद्दाम शहा, साद शेख, अरमान शेख यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### बहिणींच्या राखीने बंदिवान भाऊ गहिवरले

■ **नगर :** येथील न्यू आर्ट्स् महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने येथील खुले जिल्हा कारागृहात रक्षाबंधनाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विद्यर्थिनींनी बंदिवान बांधवाना राखी बांधून रक्षा बंधन साजरे केले. अत्यंत भावनिक अशा या कार्यक्रमात सर्व बंदिवान भाऊ गहिवरले, अनेकांचे डोळे पाणावले. याप्रसंगी खुले जिल्हा कारागृहातील तुरुंग अधिकारी बालाजी शिंगडे यांनी सामाजिक भावनेने प्रेरित असलेल्या या महाविद्यालयाच्या विद्यर्थिनींचे कौतुक करून रक्षाबंधनाचे महत्व सांगितले.

### भांगरेंच्या हस्ते भंडारदरा धरणाचे जलपूजन

■ **भंडारदरा :** येथील भंडारदरा धरणाचे जलपूजन भांगरे घराण्याकडुन नुकतेच पार पडले असून या जलपूजनासाठी तालुक्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यावेळी प्रवरा माईला साडी व चोळी अर्पण करून विधिवात पूजा करण्यात आली. अकोले तालुक्यातील ब्रिटिशकालीन असलेल्या भंडारदरा धरणाचे जलपूजन शरद पवार गटाचे युवा नेते अमित भांगरे यांच्या हस्ते करण्यात आले. या जलपूजनासाठी शरद पवार गटाच्या अकोले तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांनी हजेरी लावली होती.

### नेत्रतपासणी शिबिरात १२० रुग्णांची तपासणी

■ **शेवगाव :** तालुक्यातील दहिगाव ने येथे शेवगाव पाथर्डी मतदारसंघाचे भाग्यविधाते मा. आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शेवगाव येथे आनंद ऋषी नेत्रालय अहमदनगर यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मा. जिल्हा परिषद अध्यक्षा राजश्री घुले, ऋषिकेश घुले, विपुला घुले आदी उपस्थित होते. या शिबिराचा लाभ १२० रुग्णांनी लाभ घेतला. २० रुग्णांवर अल्पदरात करण्यासाठी अहमदनगर या ठिकाणी चंद्रशेखर घुले पाटील मित्रमंडळाच्या वतीने घुले सोय करण्यात येणार आहे.

# पद्मश्री डॉ. विखे पाटलांना भारतरत्न पुरस्कार द्यावा

## संमेलनाध्यक्ष डॉ.रविंद्र शोभणे यांची मागणी



**लोणी : प्रतिनिधी**

**पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांचे कार्य भारतरत्न पुरस्कार पेक्षाही मोठे आहे. त्यांना भारतरत्न पुरस्कार का मिळाला नाही असा प्रश्न उपस्थित करुन, क्रिकेट आणि गाण्याच्या क्षेत्रातील व्यक्तिंना हा पुरस्कार मिळतो तर पद्मश्रीं सारख्या व्यक्तिने संपूर्ण आयुष्य समाज व सहकाराकरीता झिजवीले असल्याने त्यांनाही केंद्र सरकारने भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.रविंद्र शोभणे यांनी साहित्य पुरस्कार वितरण समरंभात केली.**

सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांच्या १२४ व्या जयंती दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय साहित्य आणि कलागौरव पुरस्काराचे वितरण रविंद्र शोभणे यांच्या अध्यक्षतेखाली आणि केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थित करण्यात आले.

पुरस्काराचे हे ३४ वे वर्ष असून, यंदाच्या वर्षी मुंबई येथील जेष्ठ साहित्यीक आणि विचारवंत प्रेमानंद गज्वी यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. कानपुर येथील समिर चव्हाण यांच्या 'अखई ते जाले या ग्रंथास उत्कृष्ठ साहित्य पुरस्कार, नागपुर येथील प्रफुल्ल शिलेदार यांच्या 'हरवलेल्या वस्तुंचे मिथक' या कविता संग्राहास विशेष साहित्य पुरस्कार, संगमनेर येथील श्रीनिवास हेमाडे यांच्या 'तत्वभान' या वैचारिक ग्रंथास अहमदनगर जिल्हा उत्कृष्ठ साहित्य पुरस्कार, नेवासा येथील बाळासाहेब लबडे यांच्या 'काळ मेकर लाईव्ह' या कांदबरीस जिल्हा विशेष साहित्य पुरस्कार, कर्जत येथील हसन शेख पाटेवाडीकर यांना कलेच्या सेबेबद्दल पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कलागौरव पुरस्कार, नाशिक येथील प्राजक्त देशमुख यांना नाट्यसेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील, माजीमंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ.राजेंद्र विखे पाटील, डॉ.सुजय विखे पाटील, सौ.शालिनीताई विखे पाटील,पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष रावसाहेब कसबे यांच्यासह प्रवरा उद्योग समुहातील विविध संस्थाचे पदाधिकारी उपस्थित होते.

आपल्या भाषणात शोभणे म्हणाले की, बुध्दीप्रमाण्य वादाचा स्विकार करतो तो सत्याच्या धर्माची जान ठेवतो. यासाठी प्राणाची अहुती देणारा जागतीक स्तरावरील इतिहास आपल्या स्वातंत्र्यापर्यंत दिसून येतो. या सत्याचा अभिमान आम्हाला आहे, या अभिमानाचे आम्ही पाईक आहोत असे स्पष्ट करुन ज्ञान सत्तेने आखुन दिलेल्या व बुध्दी प्रामाण्यवादाच्या पणतीला समोर ठेवून जगण्याचा मार्ग सुकर करण्याचा प्रयत्न साहित्यीक करीत असतात.ग्रंथ प्रामाण्यवादा मध्ये प्रश्न विचारण्याची संधी नसते कारण ती पुर्वापार चालत आलेली पंरपरा आहे. मात्र बुध्दी प्रामाण्यवादाचा स्विकार करणाराच प्रश्न विचारु शकतो. कारण ज्ञानसत्तेचा प्रतिनिधी स्वत:चे सत्व जोपासून आखून दिलेला जगण्याचा मार्ग सुकर करीत असतो.कारण ज्ञानसत्तेचा प्रतिनिधी राजसत्ता आणि धर्मसत्ते पुढे झुकत नाही असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र हा ग्रामीण प्रांत आहे. ग्रामीण भागातील तानेबाणे मांडणारा महाराष्ट्र हा एकमेव प्रांत आहे. लेखक श्री.म माटे यांच्या पासून ते हरिभाऊ आपटेंपर्यंत सर्वांनी हीच परंपरा जोपासली. याचा संदर्भ देवून शोभणे म्हणाले की, दुष्काळातील शेतक-याला बोलके करण्याचा प्रयत्न केल्याचे संचित हे आपल्या पाठीमागे उभे आहे. हे संचित अधिक जगण्याचे आणि उन्नत करण्याचे काम अशा पुरस्कारामुळे होत असते.

पद्मश्री डॉ.विखे पाटील पुरस्कार हा अशा पुरस्कारांपैकीच एक आहे असे गौरवोद्गार काढुन या पुरस्कारामुळे कुठेही वाद निर्माण झाले नाही. या पुरस्काराचे निकष अतिशय प्रांजळ आहे. ज्या पुरस्काराचे निकष प्रांजळ नव्हते ते पुरस्कार केव्हाच बंद पडले. विखे पाटील परिवाराने चौथ्या पिढीपर्यंत ही पुरस्काराची योजना सुरु ठेवली. दिवसागणीक या पुरस्काराच्या योजनेमध्ये वाढच होत आहे.केवळ साहित्यच नाही तर नाट्य कला क्षेत्रासाठी सुध्दा ही योजना सुरु केली. ही योजना ना.विखे पाटील बंद पडू देणार नाहीत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी पद्मश्री डॉ.विखे पाटील व पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या वाटचालीचा गौरव करून, त्यांचा आदर्श तरुण पिढीने डोळ्यासमोर ठेवला पाहीजे. त्यांनी उभ्या केलेल्या सहकारामुळे प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्र देशात पुढे आले आहे. त्यानंतर देशातही सहकारी चळवळीचा अवलंब करण्यात आला. सहकारातून समाजाचा उध्दार करण्याचे काम झाले. त्यामुळे पद्मश्री विखे पाटील हे समाज व सहकाराचा सन्मान होता. त्यांचा आदर्श सर्वांना प्रेरणादायी असल्याचे ना.जाधव म्हणाले.

याप्रसंगी साहित्य जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले जेष्ठ नाट्य लेखक प्रेमानंद गज्वी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुरस्कारा मागची भूमिका स्पष्ट करुन, जिल्ह्याला लाभलेली साहित्य परंपरा विचारात घेवून मराठी भाषेला समृध्द करण्यासाठी अहिल्यानगर येथे मराठी भवन बांधण्याचा निर्णय जाहिर केला. पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ.रावसाहेब कसबे यांनी पुरस्कारांची घोषणा केली. याप्रसंगी डॉ.राजेंद्र सलालकर यांनी लिहीलेल्या तिव्र कोमल समिक्षेचे प्रकरण या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

## भिंगारमध्ये लाडक्या बहिणींचा रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर जल्लोष

**नगर : प्रतिनिधी - भिंगारमध्ये लाडक्या बहिणींनी रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर खात्यात तीन हजार रुपये जमा झाल्याने आमदार संग्राम जगताप यांच्या भिंगार येथील जनसंपर्क कार्यालया समोर आनंदोत्सव साजरा करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने युवक काँग्रेसचे भिंगार शहराध्यक्ष शिवम भंडारी यांच्या पुढाकाराने साजरा झालेल्या आनंदोत्सव कार्यक्रमात महिलांनी एकमेकींना पेढे भरविले.**

या आनंदोत्सवाप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संजय सपकाळ, ज्येष्ठ नेते सुदाम गांधले, सरचिटणीस विशाल (अण्णा) बेलपवार, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शिवम भंडारी, मतीन ठाकरे, दिपक लिपाणे पाटील, अक्षय नागापुरे, राष्ट्रवादी अल्पसंख्यांकचे शहर जिल्हा उपाध्यक्ष फरीद सय्यद, राजू नायर, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष संकेत झोडगे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष पै. सागर चवडंके, राष्ट्रवादी विद्यार्थी सेलचे उपाध्यक्ष करण पाटील, योगेश उबाळे, अनिल शिंदे, बनकर महाराज, कमलेश राऊत आदींसह परिसरातील महिला भगिनी मोठ्या उपस्थित होत्या.

शिवम भंडारी म्हणाले की, महायुती सरकारने केलेल्या घोषणेप्रमाणे महिलांना सन्मानपूर्वक खात्यात पैसे वर्ग केले. विरोधकांनी योजना फसवी असल्याचा अपप्रचार केला, मात्र महिलांच्या खात्यावर पैसे जमा झाल्याने त्यांची बोलती बंद झाली आहे. या योजनेमुळे महिलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, रक्षाबंधनानिमित्त महिलांना ओवाळणी भावाकडून ओवाळणी मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले.

संजय सपकाळ म्हणाले की, महिलांना आधार व सन्मान देण्याचे काम महायुती सरकारने केले आहे. रक्षाबंधन पूर्वीच महिलांच्या खात्यात पैसे वर्ग करून सरकारने दिलेला शब्द पाळला आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शासनाने जाचक अटी देखील कमी केल्या. तर आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा लाभ मिळण्यासाठी त्यांचे अर्ज भरुन देण्यात आले. भविष्यातील निवडणुकांमध्ये सर्व महिला वर्ग महायुतीच्या उमेदवार असलेल्या आपल्या भावाच्या पाठिशी ठाम उभे राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

वाचकांच्या लेखणीतून

## लालपरी नफ्याच्या उंबरठ्यावर !

सातत्याने आर्थिक संकटाशी सामना करीत गावा, घरा पर्यंत पोहचविणारी एसटी महामंडळाची लाल परी आपल्या 31 विभागा पैकी सुमारे अठरा विभागातून नफ्याच्या उंबरठ्यावर पोचली ही बातमी सुखद समाधान देणारी आहे. एसटी जगली पाहिजे, कायम धावती रहावयास हवी कारण सध्या सर्वसामान्यांना आर्थिक दृष्ट्या तीच परवडणारी सोय होय.



ज्या ज्या प्रयत्नातून, तडफेने लाल परी नफ्याकडे प्रवास करतेय त्याच उमेदीने एसटी आगारातील स्वच्छतेकडे, प्रसन्नतेकडे, उपहारगृहांच्या व्यवस्थितपणाकडे आणि मुख्यता गाड्यांच्या वेळापत्रकांकडे असेच जातीने लक्ष दिले गेले, अग्रक्रमाने पाहिले गेले तर एसटी मंडळाचे सारे विभाग, आगार नफ्याचा उंबरठा जलद गतीने पार करतील यात शंका नाही मात्र प्रशासनाची इच्छाशक्ती जबरदस्त हवी आणि प्रवाशांची साथ सोबत, सहकार्य सुद्धा.

■ **विश्वनाथ पंडित**
**ठाणे**

# 'दिल है हिंदुस्तानी'चा रसिकांनी लुटला मनमुराद आनंद !

### प्रजासत्ताक दिनानिमित्त उपक्रम | राष्ट्रभक्तीच्या गीतांनी भारावले नगरकर

**नगर : प्रतिनिधी**



**हेवा वाटावा अशी गायकी, मन प्रसन्न करणार संगीत, अंगावर शहारे आणणारे निवेदन, बहारदार नृत्य आणि देशभक्ती जागृत करणाऱ्या गाण्यांची मैफल येथील माऊली सभागृहात बहरली.**

रसिक श्रोत्यांनी केलेल्या टाळ्यांच्या कडकडटाने आणि गाण्यावर धरलेल्या ठेक्याने संकुल दणाणून गेले. निम्मित होते स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पी आर मीडिया व ऑरेंज इव्हेंट्स आयोजित दिल है हिंदुस्तानी कार्यक्रमाचे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बहारदार निवेदना सह अजरामर देशभक्ती गीते सादर करून देशाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासाला उजाळा देण्यात आला.प्रारंभी राष्ट्रगीत त्यानंतर मेरा रंग दे बसंती चोला, ऐ मेरे वतन के लोगो, सुनो गौर से दुनिया, तेरी मिट्‌टी मे मिल जावा, माँ तुझे सलाम अशी एका पेक्षा एक गाणी सादर झाली.

नितीन निंबाळकर, आदेश चव्हाण, नरेंद्र साळवे, जालिंदर शिंदे, राहुल सिसोदिया, पल्लवी खरात, रेणुका पवार,नरेश बडेकर, पूनम कदम, यांच्या सुरेल आवाजाने मैफलीला रंग भरला. त्यांना वादक अजय साळवे, निलेश सोज्वळ, एडविन पेरेपाडम, किरण खरात, सिद्धांत गायकवाड, विशाल बोर्डे, संजय आठवले यांनी सुरेख साथ दिली. रियाज पठाण आणि उद्धव काळापहाड यांच्या उत्कृष्ट निवेदनाने रसिकांचे डोळे पानावले.आयांश सोज्वळ, अर्नित खरात तसेच आकाश डान्स स्टुडिओच्या कलाकारांनी वाहवा मिळवली.

कार्यक्रमाचे उदघाटन सचिव विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश भाग्यश्री पाटील, पोलीस उपअधीक्षक हरीश खेडकर, डॉ.सुधा कांकरिया, डॉ. प्रकाश कांकरिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या वेळी १४ ऑगस्ट रोजी अतिरेक्यांशी लढताना वीरमरण आलेले शहीद कॅप्टन दीपक सिंह यांना यावेळी आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी भजन सम्राट पारस जैन, तेजस कपिले, डॉ. इमरान सय्यद, डॉ. प्रकाश गरूड, डॉ. दमन काशिद, विशाल बुऱ्हाडे, प्रा. रविंद्र काळे, केतन क्षीरसागर, अल्ताफ सय्यद, संतोष शिंदे, जयराज शेळके, धनेश खत्ती, ॲड अनुराधा येवले, सचिन साळवी, निलेश चिप्पा आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना दिवाणी न्यायाधीश भाग्यश्री पाटील म्हणाल्या की, दरवर्षी देशभक्ती गीतांचा कार्यक्रम सादर व्हायलाच हवा. देशभक्तीच्या स्फूर्तीदायक गाण्यातून लोकांना प्रेरणा मिळते व बंधुभाव निर्माण होतो. पी आर मीडिया व ऑरेंज इव्हेंट नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत विविध कार्यक्रम आयोजित करत असतात. गेली सहा वर्षापासून सातत्याने हा उपक्रम करत असल्याने त्यांनी रियाज पठाण व जालिंदर शिंदे यांचे अभिनंदन केले.

जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
नोंदणी क्र. महा. ३९६/२२
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
आमची वैशिष्ट्ये
- १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
- एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
- प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
- मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
- अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
- PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
- पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# पारनेर तालुक्याला पावसाने झोडपले

## ■ वादळी वाऱ्यात खरीप पिके भुईसपाट ■ शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान ■ झाडेही उन्मळून पडली

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यात सोमवारी (दि.१९) दुपारी १ ते ३ दरम्यान झालेल्या मुसळधार वादळी वाऱ्यासह पावसाने खरीप हंगामातील पिके भुईसपाट झाले असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे, यात शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.**

पारनेर तालुक्यात सध्या खरीप हंगामातील मुग तोडणीचे कामे सुरू आहेत, तर बाजरी हुरड्यात आहे, चालू वर्षी शेतकऱ्यांनी मका, सोयाबीन, कांदा पीकाची मोठ्या प्रमाणात पेरणी केली आहे. रविवारी तालुक्यात पावसाने हजेरी लावली मात्र सोमवारी दुपारी झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. यात शेतकऱ्यांच्या मुगाचे व शेतात डोलत असलेल्या बाजरी पिक अक्षरशः जमीनीवर लोळू लागल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. तर पाऊस पडत असताना वादळी वाऱ्यात मोठ मोठी झाडेही उन्मळून पडली.

चालू वर्षी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पावसाने हजेरी लावली. रोहिणी नक्षत्र पडल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या. बाजारातून महागडे बी बियाणे खरेदी करून शेतकऱ्यांची पेरणीसाठी लगबग सुरू झाली. पावसाने उघडीप दिल्यानंतर वापसा होताच खरीप हंगामातील मुग, बाजरी, वाटाणा, तुर, कांदा व जनावरांच्या चाऱ्यासाठी मका, कडवळ, घास आदींची पेरणी केली. त्याची उगवणही चांगल्या प्रकारे झाली. मात्र चालू वर्षी सततच्या पावसामुळे मुगाचे पिक नसतेच वाढले मात्र त्यास शेंगा कमी प्रमाणात लागल्या काही ठिकाणी तर अधिक पावसाने शेतकऱ्यांचे प्लॉटची प्लॉट पिवळे पडल्याने उभे पीक वाया गेले. कमी कष्टात व नगदी पीक म्हणून समजले जाणारे मुगाचे पीक वाया गेल्याने आम्ही जगायचे तरी कसे असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा ठाकला आहे.

दरम्यान सोमवारी दुपारी झालेल्या पावसाने खरीप हंगामातील पिके भुईसपाट झाल्याने शेतकऱ्यांचे मुग, बाजरी, मका, कडवळ, कांदा पिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे.



■ वाळवणे येथील पठारे वस्ती लगत उभी असलेले बाजरी पीक भुईसपाट झाल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. दुसऱ्या छायाचित्रात हंगा नदी दुथडी भरून वाहू लागली. (छाया : शरद रसाळ, सुपा)

# मळगंगा देवीचा जयजयकार करीत पालखीची सवाद्य मिरवणूक

## दर्शनासाठी भाविक भक्तांची मोठी गर्दी

**निघोज : प्रतिनिधी**

**राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या पालखीची मंगळवार दि.२० रोजी सकाळी आठ वाजता सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. दरवर्षी तिसऱ्या श्रावणी मंगळवार दिवशी पालखीची मिरवणूक काढण्यात येते तसेच ही पालखी पिंपरी जलसेन रस्त्यानजीक असलेल्या खैराडी या ठिकाणी नेण्यात येते अनेक वर्षांपासून ही परंपरा सुरू आहे. सकाळी वाजत गाजत मळगंगा मंदीर ते ग्रामपंचायत चौक नवी पेठ मार्गे एस टी बस स्थानक मार्गे खैराडी या ठिकाणी ही पालखी नेण्यात आली. यावेळी हजारो भावीकांनी भंडाऱ्याची उधळण करीत तसेच व देवीच्या जयजयकारांच्या घोषणा देत दर्शनाचा लाभ घेतला.**

साधारण तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या खैराडी या ठिकाणी पालखीला जाण्यासाठी एक ते सव्वा तास वेळ लागला यावेळी दुतर्फा भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. यावेळी महिला भगिनींने जागोजागी देवीचे औक्षण केले. देवीच्या पालखी मार्गावर ठिकठिकाणी रांगोळी काढीत रस्ता रांगोळी व फुलांनी सजवण्यात आला होता.

खैराडी येथे हे मळगंगा देवीचे मंदिर माजी सरपंच राजाराम कवाद यांच्या फार्महाऊस परिसरात आहे. या मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पालखी खैराडी परिसरात पोहोचताच भाविकांनी फुलांची उधळण करीत व फटाक्यांची आतषबाजी करीत पालखीचे जोरदार स्वागत केले. यावेळी पुजा अर्चा व अभिषेक करण्यात आला तसेच महाआरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित हजारो भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

खैराडी परिसरातील कवाद, लाळगे,काळे, लंके तसेच शेकडो ग्रामस्थांनी लोकसहभागातून या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यानंतर पालखी पुन्हा वाजत गाजत मिरवणूकीने गावात आणली गेली. मळगंगा मंदिरात पालखी आणल्यानंतर या ठिकाणी सत्यनारायण पूजा संपन्न झाली. हजारो भाविकांनी या पुजेच्या व देवी दर्शनाचा यावेळी लाभ घेतला. दरवर्षी श्रावण महिन्यात देवीचे पुजारी गायखे बंधू दररोज श्रावणी पुजा करीत देवीला चांदीचा मुखवठा घालीत तसेच सोने व चांदीच्या अलंकाराने सजवीत पुजा अर्चा व अभिषेक करीत असतात. वर्षभर पहाटे पाच व सायंकाळी सात वाजता गोंधळी परिवारातील दुणगुले कुटुंब संबळ आरती करीत असतात या महाआरतीसाठी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात.

देवीच्या दर्शनासाठी दररोज भाविक मोठ्या संख्येने गर्दी करतात नवसाला पावणारी व जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा मातेचा अगाध महिमा संपूर्ण राज्यात असल्याने राज्यातील विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांनी तिर्थक्षेत्र परिसराचा मोठ्या प्रमाणात विकास केला असल्याने भावीकांना सोयीसुविधा उपलब्ध झाली आहे. तसेच येथून चार किलोमीटर अंतरावर असलेल्या जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात देवीचे मोठे मंदिर आहे. भाविक निघोज गावातील मंदीरात देवीचे दर्शन घेतल्यानंतर आवर्जून जगप्रसिद्ध रांजणखळगे ( कुंड ) परिसरातील दर्शनासाठी जात असतात.



■ राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

# राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेची सर्वसाधारण सभा संपन्न

## २९ ऑगस्ट पासून संपावर जाण्याचा निर्णय



**पारनेर : प्रतिनिधी**

**राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेची द्वितीय वार्षिक सर्वसाधारण सभा शेगाव येथे उत्साहात पार पडली. याप्रसंगी संपूर्ण महाराष्ट्र विविध नगर परिषदांचे संवर्ग अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध मागण्यांसाठी दि.२९ पासून संपावर जाण्याचा निर्णय घेण्यात आला.**

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जळगाव जामोद विधानसभा आमदार संजय कुटे, खामगाव विधानसभा आमदार आकाश फुंडकर हे उपस्थित होते. याप्रसंगी संघटनेच्या माध्यमातून मागील काळात विविध संवर्ग अधिकार्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी केलेल्या कार्याबाबत माहिती देण्यात आली.तसेच, पुढील काळात ज्या मागण्या शासन स्तरावरून सोडवायचे आहेत त्याबाबत सविस्तर व विस्तृत चर्चा करण्यात आली. संघटनेचे राज्याध्यक्ष श्री कैलास चव्हाण यांनी संवर्ग अधिकाऱ्यांचे विविध प्रश्न मांडले त्यावर आमदार महोदयांनी सदरील प्रश्न जिव्हाळ्याचे असल्याने ते मा. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या माध्यमातून शासनाकडून सोडविण्यात येतील असे सर्वांना आश्वस्त केले. सभेस मुख्याधिकारी जयश्री काटकर, आशिष बोबडे, सतीश पुदाके, विजयकुमार आश्रमा, तसेच, संघटना कार्याध्यक्षा तृप्ती भामरे, सचिव जयवंत काटकर, घटना समिती अध्यक्ष राहुल पिसाळ, नाशिक विभागाध्यक्ष महेंद्र कातोरे, पुणे विभागाध्यक्ष सुनील गोर्डे, अमरावती विभागाध्यक्ष अमोल इंगळे आदी सदस्य व पदाधिकार्यांनी मार्गदर्शन केले. संघटनेचा वार्षिक लेखाजोखा श्री अर्जुन गुट्टे यांनी मांडला. यावेळी विविध पातळीवर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सदस्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

जुनी पेन्शन योजना व संवर्गाचे मूलभूत समस्या/मागण्यावर शासन स्तरावर दुर्लक्ष होत असल्याने दिनांक २९ ऑगस्ट पासून सर्व संघटना सह संपात सहभागी होण्याचा निर्णय एकमताने यावेळी घेण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्धीप्रमुख राहुल कुटे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यास अमरावती विभागाध्यक्ष अमोल इंगळे, बुलढाणा जिल्हाध्यक्ष योगेश घुगे, जगन्नाथ थोरात, रवींद्र सूर्यवंशी आदी सदस्यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रवादी युवकच्या तालुकाध्यक्षपदी गौरव नरवडे

## खा.नीलेश लंके यांच्या हस्ते नियुक्तीपत्र

**टाकळी खातगाव : प्रतिनिधी**



**राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) नगर तालुकाध्यक्षपदी टाकळी खातगाव (ता. नगर) येथील सामाजिक कार्यकर्ते गौरव नरवडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जखणगाव (ता. नगर) येथे झालेल्या कार्यक्रमात खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.**

यावेळी जिल्हाध्यक्ष रामभाऊ निमसे, उपाध्यक्ष प्रा. सीताराम काकडे ,जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवाजी होळकर, सरपंच डॉ. सुनील गंधे, मुजिब शेख, नगर तालुका सरचिटणीस अनिल नरवडे, टाकळीचे उपसरपंच मुबारक शेख आदी उपस्थित होते.

निवडीनंतर बोलताना श्री.नरवडे म्हणाले पक्षाने आपल्यावर टाकलेला विश्वास सार्थ करून पदाला न्याय देणार असल्याचे सांगून खा.लंके यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे ध्येय धोरण तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करणार असून युवकांचे संघटन करणार असल्याचे नरवडे यांनी सांगितले.या निवडीचे स्वागत होत आहे.

# हिंदू संस्कृतीच्या रक्षणासाठी युवकांनी दक्ष राहण्याची गरज

## सुधाकर गट महाराज यांची अपेक्षा

**निघोज : प्रतिनिधी**

**बांगलादेशात हिंदूंवर अन्याय व अत्याचार होत असताना रामगिरी महाराज यांनी या घटनेचा निषेध केला म्हणून त्यांच्यावर फिर्याद दाखल करीत आपल्या राज्यात काही पाकड्या प्रेमींनी निषेध मोर्चा काढला ही बाब निषेधार्थ असून हिंदू संस्कृतीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी तसेच हिंदू जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी आजच्या युवकांनी किर्तन प्रवचन धार्मिक कार्यक्रम या माध्यमातून आपल्या संस्कृतीचा विसर पडू नये यासाठी दक्ष राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन सुधाकर गट महाराज यांनी व्यक्त केले आहे.**

निघोज परिसरातील तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते किर्तनरूपी सेवेत मार्गदर्शन करताना बोलत होते. सप्ताहाचे हे २० वे वर्ष असून अशोक महाराज शिंदे, प्रविण महाराज होळकर, काशिनाथ महाराज,पोमनर, नवनाथ महाराज गट, शामसुंदर महाराज ढवळे यांच्या किर्तनसेवेचा लाभ यावेळी भाविकांना मिळाला.

तिसऱ्या सोमवारी नागेश्वराचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. पहाटे पुजा अर्चा, त्यानंतर अभिषेक दिवसभर,भजन, किर्तन , दुपारी काल्याचे किर्तन, दिवसभर फळे खिजडी महाप्रसाद अशाप्रकारे पांढरकरवाडी, ढवणवाडी व निघोज ग्रामस्थांनी लोकसहभागातून या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले होते.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके, शिवसेनेचे तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, पंचायत समितीचे माजी सदस्य डॉ भास्करराव शिरोळे, माजी सरपंच ठकाराम लंके, दुष्काळ निवारण समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लंके, सामाजिक कार्यकर्ते दिलीप ढवण, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण, युवा नेते व मुस्लिम समाजाचे पदाधिकारी मुज्जमल सय्यद, युवा नेते महेंद्र पांढरकर, पोपटराव पांढरकर, बबनराव ढवण, दौलतराव पांढरकर, जनाभाऊ पांढरकर, प्रकाश पांढरकर, रामदास पांढरकर आदिंनी या ठिकाणी भेट देऊन नागेश्वराचे दर्शन घेऊन किर्तनासाठी उपस्थित होते.

पांढरकरवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहात सुधाकर गट महाराज, जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके, शिवसेनेचे तालुकाप्रमुख डॉ श्रीकांत पठारे यांचा सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला. युवा नेते महेंद्र पांढरकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण यांनी आभार मानले.



■ पांढरकवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहात सुधाकर गट महाराज, जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके, शिवसेनेचे तालुकाप्रमुख डॉ श्रीकांत पठारे यांचा सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला.

# प्रतिक्षा बेलोटे डी बा टू युनिव्हर्सिटीत राज्यात अकरावी; बी.फार्मसीच्या प्रथम वर्षाचा निकाल जाहीर

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील सहकार महर्षी किसनराव वराळ पाटील कॉलेज बी.फार्मसीचा प्रथम वर्षाचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण मंडळ, लोणारे या विदयापीठाच्या नियंत्रणाखाली या परीक्षा होत असतात. तसेच वराळ पाटील फार्मसी कॉलेज मधील विद्यार्थिनी प्रतिक्षा अरुण बेलोटे हिला युनिव्हर्सिटीमध्ये महाराष्ट्रात ११ वा क्रमांक मिळाला आहे. तिला ९.०३एसजीपीए स्कोर मिळाला असून तिचा कॉलेज मध्ये प्रथम क्रमांक आला आहे.**




कॉलेजमध्ये स्नेहा खोसे दुसरा नंबर मिळाला असून ८.९० एसजीपीए स्कोर मिळाला आहे. तसेच किशोरी कड हिला तिसरा क्रमांक मिळाला असून हिला ८.७६ एसजीपीए स्कोर मिळाला आहे. सायली गाडिलकर चौथा क्रमांक मिळाला असून ८.६२ एसजीपीए स्कोर मिळाला आहे. तसेच विजय शेळके याला पाचवा नंबर मिळाला असून त्याला ८.४८एसजीपीए स्कोर मिळाला आहे.

प्रतिक्षा बेलोटे हिचे मूळ गाव देवीभोयरे आहे. तसेच तिचे आई-वडील शेतकरी असून परिस्थिती अत्यंत गरीब आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा कॉलेजचे अध्यक्ष रंगनाथ वराळ व सचिव विराज वराळ यांनी अभिनंदन केले आहे. यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कुलदीप वैद्य सर व उपप्राचार्या डॉ. शिफा शिकलगार मॅडम व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी कॉलेजची सचिव विराज वराळ यांनी म्हटले की कॉलेजचा निकाल हा शंभर टक्के असून मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रात व युनिव्हर्सिटीत कॉलेजचे नावलौकिक केले आहे. किसनराव वराळ पाटील कॉलेज ऑफ फार्मसी हे ग्रामीण भागात औषध निर्माण शास्त्रात शिक्षण देणारे कॉलेज आहे.या गुणवंत विद्यार्थ्यांचा निघोज व परिसरासह शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# पद्मश्री डॉ.विखे पाटलांनी कृषी क्षेत्रात अमूलाग्र बदल घडविला

## सिताराम खिलारी यांचे प्रतिपादन



**अळकुटी : प्रतिनिधी**

**पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी अहमदनगर जिल्ह्यात प्रबोधनाची चळवळ वाढीस लावली. थिंक ग्लोबली ऍक्ट लोकली या विचारधारेने त्यांनी आयुष्यभर आपले कार्य केले. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे त्यांच्या व्यक्तित्वाचे गमक होते. आशिया खंडातील पहिला सहकारी तत्वावरील साखर कारखाना त्यांनी प्रवरानगर या ठिकाणी सुरु केला व कृषीक्षेत्रात अमूलाग्र बदल घडवून आणला असल्याचे प्रतिपादन जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे विश्वस्त सिताराम खिलारी यांनी केले.**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांच्या १२४ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी पद्मश्रींच्या कार्यास उजाळा दिला. तसेच माजी पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर यांनी विखे घराण्याच्या कार्याबाबत गौरवोद्गार काढले.

याप्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य भाऊसाहेब डेरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांनी अळकुटी परिसरात विखे कुटुंबाने दिलेल्या कार्यास उजाळा दिला. यावेळी पोलीस भरती झालेले, प्रथम क्रमांक पटकवलेले व स्पर्धेमध्ये यशप्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी बाळासाहेब आवारी, ज्येष्ठ पत्रकार व पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, किसन शिंदे, अतुल माने, बाळासाहेब धोत्रे, विनोद फापाळे, अस्लमभाई इनामदार, संपत जाधव, भरत शितोळे, प्रतीक वरखडे, डेअरी डिप्लोमा प्राचार्य श्री लोखंडे सर तसेच सर्व प्राध्यापक प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. अर्जुन चाटे यांनी प्रास्ताविक केले, प्रा. स्वाती फापाळे यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रा. विशाल रोकडे यांनी आभार मानले.

# भोयरे गांगर्डात सारोळा रस्ता ते रसाळवाडी रस्त्याचे भूमिपूजन

## रस्त्याचा प्रश्न मार्गी लागल्याने ग्रामस्थ समाधानी

**सुपा : प्रतिनिधी**

**खासदार लोकनेते नीलेश लंके यांच्या माध्यमातून व ग्रामपंचायत भोयरे गांगर्डा यांच्या पाठपुराव्याने मनरेगा अंतर्गत रसाळवाडी रस्त्याचे खडीकरण व कॉंक्रिटीकरण करणे या कामाचा भूमिपूजन शुभारंभ सोमवारी (दि.१९) रोजी पार पडला. रस्ता कामाचे भूमिपूजन होऊन प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाल्याने ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.**

अनेक वर्षापासून रसाळवाडी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असताना रस्ता नव्हता, पक्का रस्ता रस्ता व्हावा यासाठी भोयरे गांगर्डा सेवा सोसायटीचे माजी चेअरमन जेष्ठ नागरिक भैय्यासाहेब रसाळ यांनी स्वतः हा मालकीची जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला व रस्ता काम सुरू झाल्यामुळे समाधान व्यक्त केले.

रसाळवाडी वर ये- जा करण्यासाठी आता सिमेंट क्रॉंक्रिटिकरणाचा रस्ता उपलब्ध होणार असल्याने तेथील रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. यावेळी सरपंच पूजा केकडे, उपसरपंच आदिनाथ गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य माजी सरपंच अनिता भोगाडे, आश्विनी भोगाडे, कांचन रसाळ, सुधीर पवार, चेअरमन अर्जुन रसाळ, माजी सरपंच भाऊसाहेब भोगाडे, माजी चेअरमन भैय्यासाहेब रसाळ, दादासाहेब रसाळ, प्रा. सुभाषराव रसाळ, सुभाष भोगाडे, दौलत गांगड, माणिक पवार, संजय पवार, राजेंद्र रसाळ, प्रदीप रसाळ, चेअरमन संतोष गांगड, किशोर रसाळ, मधुकर लगड, संजय पवार, शरद पवार, माजी चेअरमन प्रशांत रसाळ, मुख्याध्यापक भगवान रसाळ, बाजीराव गांगड, रविंद्र भोगाडे, नाना रसाळ, सुरज रसाळ, गणेश रसाळ, माजी चेअरमन दादासाहेब जवक, शेखर पवार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



■ भोयरे गांगर्डा ता. पारनेर येथील सारोळा रस्ता ते रसाळवाडी रस्त्याचे भूमिपूजन करताना सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ. (छाया - शरद रसाळ, सुपा)

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com